*चंद्रपूर-ठाणे जिल्ह्याला मॉडेल हेल्थ डिस्ट्रिक म्हणून विकसित करावेत -सुधीर मुनगंटीवार*
=============================================================

मुंबई दि. 4: चंद्रपूर आणि ठाणे हे दोन जिल्हे मॉडेल हेल्थ डिस्ट्रिक म्हणून विकसित करावेत, अशी सूचना अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

आज मॉडेल हेल्थ डिस्ट्रिक चे सादरीकरण अर्थमंत्र्यासमोर करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या या बैठकीस आमदार सर्वश्री सुरेश धानोरकर, संजय धोटे, नाना शामकुळे, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव प्रदीप व्यास, आयुक्त अनुप यादव, चंद्रपूर जिल्हाधिकारी कुणाल खेमणार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र पापळकर, यांच्यासह आरोग्य विभागाचे इतर अधिकारी उपास्थित होते.

आरोग्य विभागाने वर्षभराची दिनदर्शिका तयार करून त्याप्रमाणे राज्यभरात आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करावे, कोणत्या दिवशी कोणते शिबीर आहे याची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवावी, असे निर्देश अर्थ मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. ते पुढे म्हणाले की या अंतर्गत राज्यातील अंगणवाडी सेविका, आशा आणि इतर आरोग्य कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाचा कालबद्ध कार्यक्रम तयार केला जावा. आरोग्य विभागाने प्रत्येक रुग्णाचे हेल्थ कार्ड तयार करावे ज्यात आत्तापर्यंत त्याने घेतलेल्या उपचारांची माहिती उपलब्ध व्हावी, रेकॉर्ड व्हावी.

मॉडेल हेल्थ डिस्ट्रिक योजनेत पहिल्या टप्प्यात चंद्रपूर आणि ठाणे जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे असे सांगून श्री मुनगंटीवार म्हणाले की, चंद्रपूर हा खाणींचा जिल्हा आहे त्यामुळे प्रदूषणाचे प्रमाण ही खूप आहे, परिणामतः आरोग्याचे प्रश्न ही मोठे आहेत. जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक हा राज्याच्या सरासरी निर्देशांका पेक्षा म्हणजे 0.752 पेक्षा कमी म्हणजे 0.718 आहे. जिल्ह्यात वन पर्यटनाला खूप मोठ्या प्रमाणात संधी आहे. तर ठाणे आदिवासी जिल्हा असून येथे स्थलांतरित लोक संख्येचे प्रमाण अधिक आहे. या सगळ्या बाबी विचारात घेऊन मॉडेल हेल्थ डिस्ट्रिक साठी या दोन जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. तळागाळातल्या लोकांपर्यंत दर्जात्मक आरोग्य व्यवस्था पोहोचवणे हा या योजनेचा उद्देश आहे.

गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवांची सहजतेने उपलब्धता, आरोग्य निर्देशांकात सुधारणा ( 100 टक्के संस्थमात्मक प्रसूती, बालकांचे 100 टक्के लसीकरण, बालके, गरोदर माता आणि मुली यांच्यातील रक्तक्षय कमी करणे इत्यादी ) पायाभूत सुविधांची उभारणी, यंत्रसामग्री, कुशल आणि तज्ज्ञ मनुष्यबलाची उपलब्धता, मेडिसिन, माहिती तंत्रज्ञान सपोर्ट अशा विविध गोष्टीवर यात लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. दर्जेदार पद्धतीने आणि वेगाने पूर्णत्वाला जावे काम आरोग्य विभागाने मॉडेल हेल्थ डिस्ट्रिक चे काम वेगाने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे अशी अपेक्षा व्यक्त करून श्री. मुनगंटीवार म्हणाले की, चंद्रपूर जिल्ह्यात केवळ विदर्भातीलच नाही तर महाराष्ट्रासह आसपासच्या राज्यातील रुग्णांना उत्तम उपचारासाठी तिथे यावे वाटेल इतकी तिथली आरोग्य व्यवस्था उत्कृष्ट दर्जाची झाली पाहिजे.

मॉडेल हेल्थ डिस्ट्रिक योजनेअंतर्गत जिल्ह्यात आरोग्य सुविधांसाठी एक खिडकी योजना तयार करून रुग्णाला त्याने अर्ज देताच त्याला सर्व आरोग्य सुविधा आपण पूर्ण क्षमतेने देवू शकू, अशी व्यवस्था निर्माण करता येते का याचा विभागाने अभ्यास करावा.

चंद्रपूर जिल्ह्यात खाण कामगारांची संख्या खूप मोठी आहे त्यामुळे 100 खाटाचे भारत सरकारचे कामगार रुग्णालय सुरू करण्याबाबत पाठपुरावा करण्यात यावा असे सांगून ते पुढे म्हणाले की, 50 खाटाचे आयुष रुग्णालय सुरू करण्याबाबत आयुष मंत्रालयाकडे पाठपुरावा केला जावा .